**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीची अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध, एकंदर १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात

- सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचं आणि महिला प्रशिक्षण केंद्राचं साताऱ्यात भूमिपूजन

- सदानंद दाते यांनी स्वीकारला राज्याच्या पोलीस महासंचालकपदाचा कार्यभार, रश्मी शुक्ला सेवानिवृत्त

**आणि**

- चिपी विमानतळाला रात्रीही विमान उतरवण्याची परवानगी

**<><><><><>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगानं आज दिली. २९ महापालिकांमधल्या २ हजार ८६९ प्रभागांमधून हे उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी एकंदर ३३ हजार ४२७ अर्ज आले होते. त्यातले २४ हजार ७७१ अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ८ हजार ८४० उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. आज सकाळी चिन्ह वाटप करुन अंतिम उमेदवार यादी आज प्रसिद्ध झाली आहे.

राज्यात सर्वाधिक १ हजार ७०० उमेदवार मुंबई महापालिकेच्या रिंगणात आहे. त्यानंतर १ हजार १६६ उमेदवार पुणे महापालिका निवडणुकीत नशीब आजमावत आहेत. नागपूरमध्ये ९९३ उमेदवार नगरसेवकपदासाठी इच्छुक आहेत. सर्वात कमी २३० उमेदवार इचलकरंजी महापालिकेच्या १६ प्रभागांसाठी

निवडणुक रिंगणात आहेत. महापालिका निवडणुकीच्या संदर्भातल्या इतर बातम्या जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हाइस कास्ट***

*(मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपानं रिपब्लिकन पक्षाला एकही जागा सोडलेली नाही, हे उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यावर स्पष्ट झालं आहे. त्यामुळं मुंबईतल्या १३ जागा स्वबळावर लढवण्याचा निर्णय रिपब्लिकन पक्षानं घेतला आहे. त्याचवेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले राज्यातल्या सर्व २९ महानगरपालिकांच्या प्रचारासाठी महायुतीला साथ देणार आहेत.*

*नाशिक महापालिका निवडणुकीत तिकीट वाटपावरून निर्माण झालेल्या गोंधळाची चौकशी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण करणार आहे. याप्रकरणात दोषी आढळलेल्या नेत्यांवर कारवाई केली जाईल, अशी माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी आज नाशिकमध्ये दिली. सिडको भागात उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच काहींना एबी फॉर्म वाटण्यात आले होते. तर काही प्रभागात एकापेक्षा अधिक एबी फॉर्मचं वाटप झाल्यानं अधिकृत उमेदवारांचे अर्ज बाद ठरले किंवा त्यांना अपक्ष गृहीत धरण्यात आलं. त्यासंदर्भात महाजन बोलत होते.*

*धुळे महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी भाजपाने बेकायदेशीर मार्गांचा अवलंब केला, असा आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी आज केला. धुळे महापालिका निवडणुकीत भाजपाचे ४ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यासाठी विरोधी उमेदवारांना प्रत्यक्ष किंवा फोनद्वारे धमक्या दिल्याचा आरोप गोटे यांनी केला. एका उमेदवार महिलेला ३ अपत्य असल्याचं लक्षात आणून दिल्यावरही तिचा अर्ज वैध ठरल्याचं गोटे म्हणाले.*

*मतदान होईपर्यंत बिनविरोध असलेले उमेदवार निवडून आले आहे, असं जाहीर करु नका. 'नोटा'च्या मतदानाद्वारे या एकट्या उमेदवाराला नाकारण्याचा पर्याय मतदारांना द्या, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी केली आहे.*

*परभणी महानगरपालिकेतल्या ६५ जागांसाठी ४११ उमेदवार रिंगणात आहेत. १९७ उमेदवारांनी काल माघार घेतली.*

*दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिकेतला भ्रष्टाचार आणि कर्जाच्या प्रमाणावरून अजित पवार यांनी काल भाजपावर आरोप केले होते. त्यावर प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज प्रतिक्रिया दिली. भाजपावर आरोप करण्यापूर्वी अजित पवार यांनी आत्मचिंतन करावं. भाजपाने त्यांच्यावर आरोप करायला सुरुवात केले तर परिस्थिती कठीण होईल, असा इशारा चव्हाण यांनी दिला.*

*पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपासोबत युती झाली नाही यासाठी शिवसेनेनं भाजपाला जबाबदार धरलं आहे. शेवटच्या तासाभरात शिवसेनेला ताकदीचे ६१ उमेदवार मिळाले आहेत. त्यामुळं पिंपरी-चिंचवडमध्ये शिवसेनेला विश्वासात घेतल्याशिवाय कोणत्याच पक्षाचा महापौर होऊ शकत नाही, असा दावा शिवसेना नेते आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज केला.)*

**<><><><><>**

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सातारा जिल्ह्यातल्या नायगाव या त्यांच्या जन्मगावी त्यांच्या स्मारकाचं आणि महिला प्रशिक्षण केंद्राचं भूमिपूजन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. हे स्मारक विषमतेच्या विरोधात लढण्याची प्रेरणा देईल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

***होल्ड… बाईट- देवेंद्र फडणवीस***

नायगावचं नाव बदलून सावित्राबाई फुले यांच्या नावावरून ठेवायचा निर्णय जर इथल्या ग्रामसभेनं घेतला, तर विनाविलंब त्याला मान्यता देऊ, असं आश्वासनही त्यांनी दिलं. महात्मा फुले यांचं मूळ गाव असलेल्या कटगुणमध्ये मोठं स्मारक उभारण्याचं आश्वासन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी दिलं.

आज राज्यातही विविध ठिकाणी कार्यक्रम झाले. त्यांच्या विषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-***

*(मुंबईत लोकभवन इथं सावित्रीबाईंच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आलं. मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकमधल्या मुंबई नाका इथं सावित्रीबाईंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठात सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली तर, बीड शहरात अभिवादन रॅली काढण्यात आली.  नांदेड इथंही जिल्हाधिकारी कार्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. बुलडाणा जिल्ह्यात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त भव्य ग्रंथ प्रदर्शन, दुर्मिळ वस्तू, नाणी संग्रह, सावित्रीबाईंच्या जीवनप्रवासाची रेखाचित्रं, तसंच दुर्मिळ पक्षांच्या छायाचित्र दालनाचं उद्घाटन कामगारमंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते झालं. परभणीत पूर्णा तालुक्यात विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले आणि जिजामाता यांच्या वेशभूषा साकारून त्यांचा जीवनपट सादर केला.)*

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या २ लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जासाठी मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. १ जानेवारीपासून याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. सर्व बँका, सहकारी संस्था आणि कर्जवाटप करणाऱ्या यंत्रणांना हा निर्णय बंधनकारक राहणार आहे. या निर्णयामुळं शेतकऱ्यांची ६०० रुपयांची बचत होणार आहे.

**<><><><><>**

राज्याचे पोलीस महासंचालक म्हणून सदानंद दाते यांनी आज पदभार स्वीकारला. राज्याच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांचा कार्यकाळ आज संपुष्टात आला. त्यांच्याकडून दाते यांनी पोलिस मुख्यालयात पदभार स्वीकारला. त्यापूर्वी शुक्ला यांना पोलीस मैदानात मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शुक्ला आणि दाते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. दहशतवाद विरोधी पथक, एनआयए, सीबीआय, सीआरपीएफ अशा महत्त्वाच्या संस्थांमधल्या कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेले सदानंद दाते भारतीय पोलीस सेवेच्या १९९० च्या तुकडीतले अधिकारी  आहेत.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या चिपी विमानतळाला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं दिवस-रात्र सार्वकालीन हवामानात विमान चालनाकरता परवानगी दिली आहे, यामुळे आता या विमानतळावरुन नाईट लँडिंगसह सर्व मोसमात विमान प्रवास करणं शक्य होणार आहे. याशिवाय विमानतळावरची पार्किंगची क्षमताही ३ वरून ६ विमानांपर्यंत म्हणजे दुप्पट केल्यानं विमानतळाची कार्यक्षमता दुप्पट झाली आहे.

<><><><><>

केंद्र सरकारने नुकत्याच संमत केलेल्या विकसित भारत जी राम जी विधेयकामध्ये चार वेगवेगळ्या श्रेणीत कामांची विभागणी करण्यात आली आहे.

<><><><><>

राष्ट्रीय शिक्षण धोरण, देशाच्या नवीन पिढीला गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर काढेल असा विश्वास केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज नागपुरात एका कार्यक्रमात व्यक्त केला. भारत हा युवाशक्तीचा देश आहे. युवाशक्ती आणि भावी पिढ्यांना मातृभाषेतून तसंच स्पर्धात्मक आणि कौशल्याधारित अभ्यासाच्या माध्यमातून सबळ करणं ही शिक्षण विभागाची जबाबदारी आहे, असं त्यांनी सांगितलं. युवकांनी केवळ रोजगार शोधणारे नाही, तर रोजगार निर्मिती करणारे होणं गरजेचं आहे आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण त्या दिशेनं प्रयत्न करत आहे, असंही प्रधान म्हणाले.

<><><><><>

राज्य सरकारनं शेतकऱ्यांच्या परदेश अभ्यास दौऱ्यासाठी राज्यातल्या ६८ शेतकऱ्यांची निवड झाली आहे. हे शेतकरी युरोप, इस्त्राईलसह मलेशिया, व्हिएतनाम आणि फिलिपाईन्स या कृषिप्रगत देशांना भेट देतील, अशी माहिती पुणे कृषी संचालक रफीक नाईकवाडी यांनी दिली. जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या

आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा, संशोधनावर आधारित पद्धतींचा आणि व्यवस्थापन कौशल्यांचा थेट लाभ या शेतकऱ्यांना मिळेल.

<><><><><>

तनिषा भिसे या गर्भवती महिलेला वेळेवर उपचार आणि रुग्णवाहिका न दिल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याप्रकरणी धर्मादाय आयुक्तालयानं पुण्यातल्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला दोषी ठरवलं आहे. या प्रकरणी रुग्णालयासह ११ विश्वस्तांविरोधात फौजदारी खटला दाखल केला आहे.

<><><><><>

आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यासाठी आज त्र्यंबकेश्वर इथं स्वच्छ संकल्प अभियानाला सुरुवात झाली. कुंभमेळा विकास प्राधिकरण, जिल्हा प्रशासन आणि त्र्यंबकेश्वर नगर परिषद संयुक्तरीत्या हे अभियान राबवत आहेत. या कुंभमेळ्यासाठी देशविदेशातून लाखो भाविक आणि पर्यटक येणार असल्यानं शहर आणि परिसर स्वच्छ आणि पर्यावरणपूरक राखण्यासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत, असं मत कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉक्टर प्रवीण गेडाम यांनी यावेळी मांडलं.

<><><><><>

राज्यात गेल्या २४ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात हवामान कोरडं होतं. सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं ९ पूर्णांक १० अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात राज्यभरात हवामान कोरडंच राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//